# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad@dtemaharashtra.gov.in


तातडीचे परिपत्रक

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१८/ 2828

दिनांक :- 6 AUG 2018

प्रति,

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय/औषधनिर्माणशास्त्र महाविदयालय,औरंगाबाद

उपसचिव तंत्रशिक्षण मंडळ, प्रा. का. औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने, औरंगाबाद/जालना/अंबड/हिंगोली/नांदेड/जिंतूर/बीड/उस्मानाबाद /पु.ला.शा.तं.लातूर/निवासी महिला लातूर

विषय :- राज्य शासकीय कर्मचा-यांचा दि. ७, ८ व ९ ऑगस्ट २०१८ रोजी होणा-या संपाबाबत.

संदर्भः- सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. ४अ/ आस्था/२०१८/५३८, दि. ०४ ऑगस्ट २०१८

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, राज्य सरकारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी राज्य सरकारी कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित मागण्यासंदर्भात दि.७, ८ व ९ ऑगस्ट २०१८ रोजी ३ दिवसासाठी संप पुकारला आहे. सदर संपामध्ये राज्यातील सरकारी अधिकारी/कर्मचारी, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म.ना.से. (वर्तणूक) नियम १९७९, मधील नियम क्र.६ नुसार शासकीय कर्मचा-यांने संप/निदर्शने यामध्ये सहभाग घेऊ नये असे स्पष्ट केले आहे.

त्यानुसार संघटनेद्वारे आयोजीत संपात कार्यालयीन वेळेत सहभागी होणे ही राज्य शासकीय कर्मचा-याची कृती म. ना. से. (वर्तणूक) नियम १९७९, मधील नियम क्र.६ चा भंग करणारी ठरेल व संपात सहभागी झालेले कर्मचारी शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र ठरतील.

सबब सरकारी अधिकारी/ कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत संपात सहभाग घेणे गैर वर्तणुकीची बाब समजण्यात येईल व आशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल अशा प्रकारचे आदेश निर्गमीत करुन त्यांच्या निदर्शनास आणावे. तसेच आदेशाची प्रत प्रत्येक विभाग/ कार्यालयामध्ये सुचना फलकावर लावण्यात यावी. तसेच अधिकारी/ कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत संपात भाग न घेण्याविषयी मन वळविण्याचा प्रयत्न करावा. तसेच कार्यालयीन कामाच्या वेळेत मोर्चा, निदर्शने आंदोलने करण्यास प्रतिबंध राहील.

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

C/Deepak/Asta3\CIRCULAR/

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी